
ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष २८ | पुणे, बुधवार, १९ जानेवारी, १९७२ | अंक १



तुमच्या हौसेच्या वस्तु तुम्हाला अशाच वारंवार खरेदी करता याव्यात असे वाटते ना? बँक ऑफ महाराष्ट्रच्या रिकरींग डिपॉझीट मधे नियमित पणें पैसे गुंतवा.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

### युद्ध गुन्हेगारांवरील खटल्यांची पार्श्वभूमी

बांगला देशाच्या जनतेवर पाकिस्तानच्या लष्कराने आणि त्याच्या हस्तकांनी अनेक अत्याचार केले. ह्या भीषण हत्याकांडाची माहिती आता जगभर पसरली आहे. हिंदी लष्कराच्या मदतीने बांगला देश स्वतंत्र झाला. आता तेथील सरकारने युद्ध गुन्हेगारांची चौकशी करून अपराध्यांना शिक्षा करण्याचे ठरविले आहे. युद्धकाळांत विरोधी पक्षांनी केलेल्या कृत्याबद्दल त्यांना दोषी ठरविण्याची कल्पना दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस उदयास आली. हिटलरच्या लष्कराने केलेल्या अमानुष वंशहत्येची माहिती जसजशी बाहेर येऊ लागली तसतसे ह्या कल्पनेने मूळ धरले आणि इंटरनॅशनल मिलिटरी ट्रायब्यूनलची स्थापना करण्यात आली. ह्या लष्करी न्यायालयाचा आधार म्हणजे ८ ऑगस्ट १९४५ ह्या दिवशी विजयी दोस्त राष्ट्रांनी परस्परांत केलेला करार. ह्या करारावर रशिआ, अमेरिका, ब्रिटन व फ्रान्स ह्यांनी सह्या केलेल्या आहेत. जर्मनी, इटली व जपान ह्या देशांतील प्रमुख युद्धगुन्हेगारांना लष्करी न्यायालयांत खेचून शिक्षा करण्याचा अधिकार लष्करी न्यायालयाला ह्या कराराप्रमाणे देण्यात आला होता. वंशहत्या करण्याच्या गुन्ह्यांचीही दखल घेण्याचे अधिकार न्यायालयाला देण्यात आले होते. हिटलरच्या अमदानीत युरोपमधील ज्यू लोकांची निर्घृण हत्या करण्यात आली. मानवतेविरुद्ध करण्यात येणारे गुन्हे ह्या सदराखाली न्यायालयाने ज्यूंच्या हत्याकांडाची दखल घेतली. वंशहत्या हा शब्दप्रयोग व त्यातील कल्पना १९४४ पर्यंत उद्भवलेली नव्हती. १९४४ साली कायद्याच्या एका पोलिश प्राध्यापकाने ह्या विषयावर पुस्तक लिहिले. तेव्हापासून वंशहत्या हा शब्दप्रयोग रूढ झाला. ह्या कल्पनेला आता संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या कागदोपत्री स्थान मिळाले असले तरी तिचा जनक मात्र अमेरिकेत दारिद्र्यात मरण पावला.

---

### अमेरिकन विमानांची अमानुष बॉम्बफेक

व्हिएटनाममधील अमेरिकन फौजा काढून घेण्याच्या वाटाघाटी चालू असतानाच अमेरिकेने उत्तर व्हिएटनामवर फार मोठ्या प्रमाणावर बॉम्बहल्ले केले. ह्या बॉम्बच्या वर्षावामुळे केवळ मनुष्य हानी व मालमत्तेचे नुकसान होत आहे असे नाही. बॉम्बच्या भयंकर माऱ्यामुळे तेथील निसर्गाचा समतोलच नाहीसा होत आहे. अमेरिकेने एक नव्या प्रकारचा बॉम्ब तेथे उपयोगात आणला आहे. एका बॉम्बच्या स्फोटामुळे १० हजार चौरस वारातील सर्व वस्तूंचा समूळ नाश होतो. अशा प्रकारचे १५० बॉम्ब्स अमेरिकन विमानांनी वापरले आहेत. त्यांच्या वापरामुळे १,१९,४०० एकर भूभागात कोठल्याही प्रकारचे जीवन अस्तित्वात राहिले नाही. बॉम्बच्या स्फोटाचा दणका छोट्या अणुबॉम्ब इतका भयंकर असतो. त्याचे वजन ७ टन असते. अमेरिका आपल्याजवळील नवी शस्त्रास्त्रे इंडोचायनातील युद्धात वापरून पहात आहे.


## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बेक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| सांपत्तिक स्थिती | ३०-६-१९७१ रोजी |
|---|---|
| १. भांडवल व निधी | रु. १८८५ लाख |
| २. ठेवी | रु. ९३३१ लाख |
| ३. कर्जे | रु. १४१८९ लाख |
| ४. एकूण खेळते भांडवल | रु. १९५५१ लाख |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिल वसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

**सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक**

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ — कार्यकारी संचालक
श्री. वसंतराव दादा पाटील — अध्यक्ष



तारेचा पत्ता : "मॉर्गेज" नी
दूरध्वनी: मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)
कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)
उपकार्यालय नं. १: २६०३०६ नं. २: २९०००६

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१ अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले — व्यवस्थापक
जी. पी. भावे — कार्यकारी संचालक

☆ अर्थ ☆

बुधवार, १९ जानेवारी, १९७२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

“अर्थ एव प्रधान:” इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## अमेरिकन आर्थिक मदतीचे राजकारण

अमेरिकन, नव्हे सर्व परदेशी मदतीशिवाय आपण आपली प्रगती घडवून आणली पाहिजे ह्यावर पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांनी आता भर दिला आहे. १७ वर्षांपूर्वीच फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीच्या वार्षिक अधिवेशनात १९५४ मध्ये पंडित नेहरू म्हणाले होते, “ आपण स्वत: किती प्रगती करतो ह्यावरच आपली खरी प्रगती अवलंबून आहे. इतरांवर अवलंबून राहण्यापेक्षा मंद गतीने प्रगती झाली तरी हरकत नाही. आपण कुबड्यावरच कायम चालत राहिलो, तर प्रगती होणार कशी ? ” तथापि आपण कुबड्या टाकून देण्याचे धाडस केले नाही आणि परकीय मदत घेतच राहिलो.

भारताला मिळणाऱ्या मदतीमधील अमेरिकेचा वाटा कमी होत चाललाच होता आणि ह्या मदतीचे स्वरूपही बदलत चालले होते. डॉलरचे ७·९% ने अवमूल्यन झाले आहे त्याचप्रमाणे रुपयाची डॉलरमधील किंमत ३% ने वाढली आहे. त्याचा एक महत्त्वाचा परिणाम असा की डॉलरची रक्कम तीच राहिली तरी रुपयातील तिची किंमत कमी भरेल आणि भारतातील डॉलरमध्ये करावी लागणारी परतफेडही कमी होईल.

अमेरिकेच्या आर्थिक मदतीचा इतिहासच राजकीय स्वरूपाचा आहे. भारताने ब्रिटिश राष्ट्रकुलात राहण्याचे ठरविले, चीनला तात्काळ मान्यता देण्याची टाळाटाळ केली, कोरिअन युद्धात पाश्चात्यांची बाजू घेतली, ह्यामुळे अमेरिका भारताला मदत देण्यास प्रवृत्त झाली. भारताचे अपक्ष राहण्याचे धोरण अमेरिकेला आवडले नाही; भारताने अमेरिकेला शंभर टक्के पाठिंबा दिला नाही, हे तिला नेहमीच खुपत आले आहे.

भारताला स्वातंत्र्यानंतर ३१ मार्च, १९७१ अखेर १८,२२५ डॉलर्सची परराष्ट्रीय मदत मिळाली आहे. तिच्यापैकी ७०% कर्जाच्या स्वरूपाची आहे, २४% मालाच्या स्वरूपाची आहे आणि ६% ग्रँटच्या स्वरूपाची आहे. अमेरिकेकडून मिळालेल्या मदतीपैकी ८०% परत फेडावयाची आहे; फक्त २०% मदत शुद्ध देणगीच्या स्वरूपाची आहे. अमेरिकेच्या मदतीचे एकूण मदतीशी प्रमाण पहिल्या योजनाकाळात ७०% दुसऱ्या योजनाकाळात ५५% आणि तिसऱ्या योजनाकाळात ५८% होते.

अमेरिकेने मालाच्या स्वरूपात दिलेल्या मदतीत गहू आणि कपास ह्यांचा मुख्यत्वेकरून समावेश आहे. अर्थात कपाशीचा वाटा गव्हाच्या मानाने फक्त १४% आहे. मिळणारी मदत कोणत्या कारणासाठी, कशी वापरावयाची, हे अमेरिका भारताकडून करारात लिहून घेत आलेली आहे. भारताला त्याबाबत मोकळीक नाही. भारताने कोठून मदत घ्यावी हेही अमेरिकाच सांगत असे. त्यामुळे भारताला माल फार महाग पडत असे. भारताला मदत न देण्याचे धोरण अमेरिकेनेच अवलंबिल्यामुळे आपणास स्वावलंबी होणे भागच पडणार आहे. त्याबद्दल आपण प्रेसिडेंट निक्सनचे ऋणी राहिले पाहिजे.

---

## आयात मालाच्या जागी पर्यायी माल वापरण्याचे प्रयत्न

हिंदला परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीबाबत अनिश्चितता उत्पन्न झाली आहे. भारत-पाकिस्तान युद्धानंतर तर परदेशीय मदतीचा ओघ रोडावत जाण्याचा संभव अधिकच वाढला आहे. अत्यंत आवश्यक स्वरूपाची परदेशी मदत बंद झाल्यास भारतामधील औद्योगिक उत्पादन घटण्याची शक्यता आहे. ह्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी भारत सरकार कसोशीचे प्रयत्न करीत आहे. आतापर्यंत आयात करण्यात येत असलेल्या मालाच्या जागी देशातीलच माल वापरण्यावर भर देण्यात येत आहे. योग्य प्रकारच्या देशी मालाचा शोध जारीने करण्यात येत आहे. आयात मालाच्या जागी देशी माल वापरण्याचा सर्वच प्रश्न आणीबाणीच्या स्वरूपाचा म्हणून हाताळण्यात येत आहे. असा जितका अधिक माल उपलब्ध होऊ शकेल तितका हुडकून काढण्याचा आदेश सरकारच्या औद्योगिक विकास खात्याने दिला आहे. ह्या बाबत बोलताना खात्याचे मंत्री श्री. मोहिनुल हक चौधरी म्हणाले की परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीपैकी फार मोठा हिस्सा एकदम बंद झाला तर काही हंगामी स्वरूपाच्या अडचणी निर्माण होतील. पण दूरवरच्या परिणामाकडे लक्ष दिले तर त्यामुळे फायदाच होईल. कारण, विविध प्रकारच्या औद्योगिक मालाचे उत्पादन वाढेल. आयातीच्या मालाऐवजी पर्यायी माल वापरण्याची बाब सोडली तरी आयातीसाठी द्यावयाच्या परवाना पद्धतीतही बदल करण्यात येत आहे. त्याचाही परिणाम पर्यायी माल अधिकाधिक प्रमाणात मिळू लागण्यात होईल. औद्योगिक वाढीत दिसून येणारी मंदगती काही प्रमाणात केवळ आकडेवारीमुळे दिसते. खरी ती तशी नसते. ज्या ज्या आधारावर गती अजमावण्यात येते तो आधार कालबाह्य झालेला आहे. शिवाय छोट्या उद्योगधंद्यांचे उत्पादन जमेस धरलेले नाही.

## अर्थव्यवस्थेच्या विकासाची मंद गती

मुंबई येथील गोखले क्लबच्या विद्यमाने प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. एफ्. ए. मेहता ह्यांचे भाषण झाले. देशाच्या अर्थव्यवस्थेची वाढ सध्या खुंटल्यासारखी झाली आहे, त्याचा उल्लेख करून डॉ. मेहता म्हणाले की अर्थव्यवस्थेच्या विकासाची सध्याची अवस्था संकटग्रस्त आहे. तीमधून बाहेर पडावयाचे असेल तर औद्योगिक उत्पादनाच्या वाढीचा वेग झपाट्याने सुधारला पाहिजे. तरच संकटकालीन अवस्थेतून बाहेर पडून अर्थव्यवस्था योग्य मार्गास लागेल. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधीत दरसाल ९ टक्क्यांनी विकास होईल असा अंदाज नियोजन समितीने केला होता पण हा अंदाज बरोबर ठरला नाही. ४ थ्या कार्यक्रमाच्या पहिल्या तीन वर्षांत अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग फक्त ३·५ टक्के दिसून आला आहे. अपेक्षा केल्याप्रमाणे ९ टक्क्यांनी वाढ झाली असती तर देशाच्या उत्पन्नात १८०० कोटींची भर पडली असती. पण वाढीचा वेग ३·५ टक्केच पडल्याने कठीण परिस्थिती उत्पन्न झाली आहे. अजूनही ९ टक्के वाढीचा वेग अमलात आणला गेल्यास दरसाल ६०० ते ६५० कोटी रुपयांची भर पडेल. ह्या उत्पन्नातून बांगला देशाच्या मदतीसाठी २०० कोटी रुपये देता येतील व संरक्षणावर होणारा १५० कोटी रुपयांचा जादा खर्च सोसता येईल. त्याशिवाय रुपयाच्या अवमूल्यनापोटी लागणारे २५ कोटी रुपये हाती येतील. महागाई भत्त्यात वाढ करून देण्यात आल्यामुळे लागणारे २५ कोटी रुपये मिळू शकतील आणि सरहद्दीवर असणाऱ्या राज्यांना जादा मदत देण्यासाठी २५ ते ३० कोटी रुपये उपलब्ध होऊ शकतील. विकासाच्या वाढीचा वेग ९ टक्के पडल्यासच हे शक्य होईल.

---

## विजयासाठी राबणारी अज्ञात माणसे

रणांगणावर लढणाऱ्या जवानांच्या पाठीशी जनतेची संघटना असावी लागते. ह्या संघटनेत लष्कराला रणसाहित्य पुरविणाऱ्या कारखान्यांना आणि त्यांत राबणाऱ्या अज्ञात माणसांना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. ही माणसे प्रसिद्धीच्या प्रकाशात येत नाहीत, आणि तरीही त्यांच्या कार्याचे मोल फार मोठे आहे. पाकिस्तानने भारतावर आक्रमण केल्यापासून म्हणजे ३ डिसेंबर पासून देशांतील युद्धसाहित्याचे ३० कारखाने जवळजवळ २४ तास चालू ठेवण्यात आले होते. नाना प्रकारचा दारूगोळा, स्फोटके, स्वयंचलित बंदुका, इत्यादींचे उत्पादन अव्याहत चालू होते. युद्धकाळात ह्या कारखान्यांनी आपल्या उत्पादनात ३० पासून ४७५ टक्क्यांनी वाढ घडवून आणली. युद्धसाहित्याचे उत्पादन करणारे हे कारखाने संरक्षण उत्पादन खात्याच्या अखत्यारीत असतात, आणि त्यातून जवळजवळ १॥ लाख कामगार काम करीत असतात. रणांगणावरील सैनिकांच्या तातडीच्या गरजा पुरविणाऱ्या कारखान्यांतील कामगारांनी दर आठवड्याला ७२ तास काम करण्याची जिद्द दाखविली. रणसाहित्यात जरूर वाटणारे काही बदलही त्यांनी केले. रशिअन बनावटीच्या मिग २१ ह्या विमानांतून न्यावयाचे बॉंब रशिआत तयार केलेले असावे लागतात. परंतु त्यांच्या ऐवजी भारतात तयार झालेले बॉंब वाहून नेण्याची सोय मिग २१ विमानांत करण्यात आली. विमानविरोधी तोफांच्या गोळ्यात वापरण्यासाठी जी वात लागते ती तयार करण्यासाठी विशिष्ट रसायन लागते. हे रसायन परदेशांतून आयात करावे लागते असे. त्याऐवजी देशांतील सामग्रीचा उपयोग करून काम भागविण्यात आले. अशी आणखीही काही उदाहरणे देता येतील.

## इंडिअन एअरलाइन्सच्या आर्थिक स्थितीवर युद्धाचा परिणाम

नुकत्याच झालेल्या भारत-पाक युद्धाचा परिणाम इंडिअन एअरलाइन्सच्या आर्थिक स्थितीवर झाला आहे. कंपनीचे अध्यक्ष श्री. एन्. पी. सेन ह्यासंबंधी माहिती देताना म्हणाले की युद्ध सुरू झाल्यामुळे कंपनीच्या डिसेंबरमधील उत्पन्नात सुमारे ३ कोटी रुपयांची घट झाली असा अंदाज आहे. युद्धाचा प्रतिकूल परिणाम कंपनीवर अनेक रीतीने झाला आहे. एक तर विमानांच्या खेपांत कपात करावी लागली. त्यामुळे होणाऱ्या नुकसानीत हौशी प्रवाशांच्या संख्येत होणाऱ्या घटीमुळे अधिकच भर पडली. त्या शिवाय कंपनीच्या वाहतुकीच्या नेहमीच्या व्यवस्थेत विस्कळीतपणा आला. त्यापायीही काही नुकसान होत राहिले. असे असले तरी नुकसान टाळण्यासाठी विमान वाहतुकीच्या दरात वाढ करण्याचा इरादा नाही. होणारी हानी इतर मार्गांनी भरून काढण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. विमानाचा अधिकात अधिक उपयोग करून घेण्याची खटपट चालू आहे. काटकसरीचे इतर अनेक उपायही योजण्यात येत आहेत. त्याचा परिणाम होऊन चालू आर्थिक वर्षात कंपनीच्या खर्चात १·२५ कोटी रुपयाची बचत करणे शक्य होईल. बांगला देश स्वतंत्र झाल्यावर कलकत्त्यापासून आगरताळ्याला जाणारी विमाने त्या देशावरून उड्डाण करून जाऊ लागली. एक वर्षापूर्वी भारताचे एक विमान जबरीने पळवून लाहोरला नेण्यात आले होते. तेव्हापासून पाकिस्तानच्या प्रदेशावरून उड्डाण करण्याचे बंद झाले होते. अर्थातच इंडिअन एअरलाइन्सच्या विमानांना विनाकारण वळसा घेऊन भ्रमंती करावी लागत असे. त्यामुळे दर आठवड्याला ४·५ लाख रुपये जादा खर्च येत असे. आता तो वाचला आहे. ता. २६ डिसेंबर, १९७१ पासून ढाका ते कलकत्ता वाहतूक पुन्हा सुरू करण्यात आली आहे.

---

## नोबेल पारितोषिकाचे ६२ लक्ष रु. धर्मादाय

वेस्ट जर्मन चॅन्सलर मि. विली ब्रांट ह्यांनी स्वतःस मिळालेल्या नोबेल शांतता पारितोषिकाची सर्व रक्कम (८६,००० डॉलर्स = सुमारे ६२ लक्ष रु.) धर्मादाय देण्याचे ठरविले आहे.

# इतर व्यापार-उद्योगांप्रमाणे शेतीलाही कॅश-क्रेडिट स्वरूपात कर्जपुरवठा हवा

(महाराष्ट्र स्टेट को. बँकेचे अध्यक्ष श्री. वसंतराव-दादा पाटील ह्यांच्या अध्यक्षीय भाषणातील उतारा)

## कॅश-क्रेडिट हवे

थकबाकीच्या संदर्भात वसुली व्यवस्था अधिक परिणामकारक करायला हवी हे तर खरेच. पण तेवढ्याने मूळ प्रश्न सुटेल असे वाटत नाही. त्यासाठी शेती कर्ज व्यवहाराच्या पद्धतीतच मूलगामी बदल करण्याची वेळ आली आहे असे वाटते. शेती धंद्याचे बदलते स्वरूप ध्यानात घेऊन इतर व्यापार-उद्योगाप्रमाणे शेतीलाही कॅश-क्रेडिट स्वरूपात कर्जपुरवठा व्हायला हवा. एका विवक्षित दिवशी शेती कर्जाची बाकी शून्य व्हावी ही अपेक्षाच अव्यवहार्य आहे. त्याऐवजी शेतकऱ्याच्या खात्यात त्याच्या खावटीसह सर्व व्यवहारांचे दिसणारे चित्र पडताळून त्याचे व्यवहार योग्य तऱ्हेने होत असतील तर कोणत्याही एका दिवशी बाकी शून्य होण्याची अपेक्षा न करता त्याच्या कर्जमर्यादेचे नूतनीकरण करून त्याला सतत कर्जपुरवठा करायला हवा. गेल्या वर्षात ऊसकरी शेतकऱ्यांना द्यावयाच्या पीक-कर्जाचेबाबतीत काहीशी अशा प्रकारची पद्धत रिझर्व बँकेच्या सूचनांप्रमाणे राबवून पाहावयाचे ठरले. त्याप्रमाणे सुरवातही झालेली आहे. मात्र या व्यवस्थेमधून शेतकऱ्यांची सोय होण्याऐवजी गैरसोयच होत आहे. कॅश-क्रेडिटमध्ये अभिप्रेत असलेला अर्थ या पद्धतीत नाही हे मी प्रथमच स्पष्ट करू इच्छितो. ही पद्धत म्हणजे कॅश-क्रेडिट व पीककर्ज या दोन्हींहून निराळाच एक पर्याय आहे. फार तर त्याला सुपरवाइज्ड क्रेडिट म्हणता येईल. रिझर्व बँकेने असे पर्याय काढण्यापेक्षा केव्हा तरी एकदा शेतकऱ्याला लागणाऱ्या सर्व पिकांच्या कर्जाकरता निर्भेळ कॅश-क्रेडिट योजना मान्य करायला हवी. म्हणजे त्यातल्या उणिवा स्पष्ट होतील आणि अशा तऱ्हेच्या कर्जव्यवहाराची पद्धती निश्चित करता येईल.

उसाची लावणी केल्यापासून गाळप होऊन पैसा हातात यायला सर्वसाधारणपणे १८ ते २० महिने तरी लागतात. हे रिझर्व बँकेला पटवून देऊन त्यासाठी १२ महिन्यांहून अधिक मुदतीचे कर्ज मिळावे यासाठी पाच-सहा वर्षे आपले प्रयत्न चालू होते. शेवटी भारताच्या अर्थमंत्र्यांपुढे हा प्रश्न काढावा लागला तेव्हा याबाबत काही तोड निघण्याची चिन्ह दिसू लागली. रिझर्व बँकेने सर्व संबंधितांची सभा घेऊन त्यांच्याशी चर्चा करून कॅश-क्रेडिट स्वरूपाची एक पद्धत ठरविली. या पद्धतीप्रमाणे मागील वर्षी दिलेल्या कर्जाचा ३० जून, १९७१ रोजी येणे असलेली चालू बाकी (थकबाकी वगळून) दरवर्षी एक चतुर्थांश याप्रमाणे पुढील चार वर्षात फेडावयाची आहे. १९७१-७२ पासून दरवर्षी करावयाच्या उसाच्या लावणीसाठी नेहमीच्याच पद्धतीने कर्ज द्यावयाचे व मागील हंगामात लावलेल्या उसाच्या गळितातून त्याच वर्षात या नव्या कर्जाची फेड करावयाची आहे. म्हणजेच कर्ज उचलल्यापासून जेमतेम पाच-सात महिन्यांतच गळितातून त्याची फेड करावी लागणार आहे. त्याचबरोबर आणखी एकचतुर्थांश रकम ३० जून, १९७१ च्या बाकीपोटी वसूल करावी लागणार आहे. या पद्धतीने शेतकऱ्याचे पदरात काहीच पडले नाही. त्यांच्या सोयीचा नुसता आभास निर्माण झाला. एक तर वर उल्लेख केल्याप्रमाणे सर्व पिकांसाठी निर्भेळ कॅश-क्रेडिट तरी द्यावे, किंवा पीककर्जच द्यावयाचे झाल्यास त्याची मुदत निदान २० महिने तरी द्यावी. रिझर्व बँकेने सुचविलेल्या पद्धतीने कर्जव्यवहार करणे किती शेतकऱ्यांना शक्य आहे हा एक प्रश्नच आहे. म्हणून ह्या प्रश्नाचा पुनः एकदा सर्वांगीण विचार व्हायला हवा.

## बिगर-शेती कर्जव्यवहार

सहकारी बँकांना रिझर्व बँकेकडून प्रामुख्याने शेतीकर्ज-व्यवहारपोटी सवलतीच्या दराने कर्ज मिळते. साहजिकच असे कर्ज जितके जास्त रिझर्व बँकेकडून मिळेल तितक्या प्रमाणात इतर संस्थांच्या गरजा भागविणे सहकारी बँकांना सोपे होते. मात्र रिझर्व बँकेचा याबाबतचा दृष्टिकोन असावा तितका व्यापक नाही. शेतीकर्जाच्या व्यवहारात सहकारी बँकांनी स्वतःच्या अर्थसंचयातून किमान काही भाग गुंतवला पाहिजे (मिनिमम इन्व्हॉल्व्हमेंट) असा आग्रह धरण्यात येतो. यामागे स्वतःची साधनसंपत्ती वाढविण्यास सहकारी बँकांना भाग पाडण्याचा विचार आहे. तो स्तुत्यही आहे. पण याचा परिणाम म्हणून पुष्कळदा शेतीव्यतिरिक्त इतर कर्जव्यवहार सहकारी बँकांना आखडता घ्यावा लागतो. बिगर-शेती सहकारी संस्थांच्या वाढीवर याचा अनिष्ट परिणाम होतो. या गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सहकारी बँकव्यवस्थेवर सर्व प्रकारच्या सहकारी आर्थिक व्यवहारास पैसा पुरविण्याची जबाबदारी आहे. या व्यवहाराची विविधता व परिणाम ही झपाट्याने वाढत आहेत. सहकारी समाजव्यवस्थेच्या शीघ्र प्रस्थापनेकरिता या सर्वास योग्य प्रमाणात भांडवल पुरविणे अत्यावश्यक आहे.

## रिझर्व बँकेचे धोरण लवचिक हवे

राज्य बँक अथवा जिल्हा बँका बिगर-शेतकी व्यवहारात पैसा गुंतवतात तो आपल्या राष्ट्रीय धोरणाची पूर्तता करण्याच्या दृष्टीनेच. अशा तऱ्हेचा विकासाचा दृष्टिकोन रिझर्व बँकेनेही घ्यावा अशी विनंती करणे वावगे ठरणार नाही. एकमार्गी भूमिकेतून नियमांच्या चौकटीला घट्ट चिकटून न बसता नियमांचा मूळ उद्देश ध्यानात घ्यावा. प्रस्थापित ध्येयधोरणाशी सुसंगत अशा तऱ्हेने केलेला सर्व प्रकारचा कर्जपुरवठा आवश्यक आहे. या दृष्टीने त्याकडे बघावे आणि लागेल ती मदत करण्यास उत्साहाने पुढे यावे असे मी कळकळीचे आवाहन करतो.

हे सांगताना मला या गोष्टीची जाणीव आहे की, रिझर्व बँकेला सबंध देशासाठी समान धोरण ठेवायला हवे. तसे ते जरूर

असावे. मात्र या सर्वसामान्य धोरणाच्या चौकटीतच सर्व ठिकाणी एकाच पद्धतीने काम व्हावे असा अट्टाहास नसावा. निरनिराळ्या राज्यांतील परिस्थितीस अनुसरून व अनुभव लक्षात घेऊन कार्यक्रमाची आखणी व्हावी. या कार्यक्रमासाठी अर्थसाहाय्य देताना स्थानिक परिस्थिती आणि गरजा ध्यानात घेऊन नियम व अटींमध्ये थोडे फेरफार करायला हरकत नाही. अशा तऱ्हेच्या फेरफारातूनच नवीन पायंडे निर्माण होतात. त्यातूनच प्रगती होत असते. चाकोरीबाहेर जराही इकडे तिकडे जायचे नाही असे धोरण ठेवल्यास ते संस्थांच्या प्रगतीला उपकारक ठरत नाही.

---

### फाळणीचे पाप जीनांच्या माथी मारले

ब्रिटिश साम्राज्याचा इतिहास प्रकाशित करण्यासाठी लंडनमध्ये एक नवीन मासिक काढण्यात आले आहे. ह्या मासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन अखंड भारताचे शेवटचे ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड मौंटबॅटन ह्यांनी केले. ह्या वेळी बोलताना ते म्हणाले "१९४७ साली अखंड भारताची भारत व पाकिस्तान ह्या दोन देशांत फाळणी करावी लागली ही दुःखद घटना आहे. भारतात सत्तांतर घडवून आणण्याचे काम करताना अखंड भारत टिकविण्याचे प्रयत्न यशस्वी होतील अशी आशा वाटत होती. परंतु मुस्लिम लीगचे महमद अली जीना ह्यांचा अखंड भारताला विरोध होता. सत्तांतर न करता तसेच राज्य चालविण्यापेक्षा सत्तांतर करणे बरे असा निर्णय त्या वेळी ब्रिटनने घेतला. हा निर्णय दुःखद होता आणि आता तर तो अधिकच शोकप्रद असलेला दिसून येतो."

### रोमन कॅथॉलिक जोगिणींची बांगला देशातील सेवा

बांगला देशातील कित्येक स्त्रियांवर पाकिस्तानी सैनिकांनी अत्याचार केल्यामुळे त्यांतील काही स्त्रिया गर्भवती झाल्या आहेत. ह्यांच्या मदतीसाठी अल्बेनिया मातृभूमी असलेल्या आणि भारतात दीन-दुबळ्यांसाठी आयुष्य वेचलेल्या मदर टेरेसा आपल्यासारख्या दहा जोगिणींसह बांगला देशाकडे रवाना होत आहेत.

### सरकारी समारंभात मद्यास बंदी

बांगला देशातील कोणत्याही सरकारी समारंभाचे वेळी मद्य दिले जाणार नाही. बांगला देशाच्या परदेशी वकिलातीतही हाच नियम पाळला जाईल.

### नेपाळमध्ये चीन स्टेडियम बांधून देणार

चीन नेपाळमध्ये एक स्पोर्ट्स स्टेडियम बांधून देणार आहे.

**जखमी युद्धकैद्यांची अदलाबदल** — भारत व पाकिस्तान ह्यांनी पकडलेल्या जखमी युद्धकैद्यांची अदलाबदल लवकरच होऊ लागेल. पाकिस्तानचे १८३ जखमी युद्धकैदी भारताच्या ताब्यात आहेत. ३० हिंदी जखमी युद्धकैदी पाकिस्तानच्या ताब्यात आहेत. भारताच्या ताब्यात पाकिस्तानचे एकूण ८० हजार युद्धकैदी आहेत. पाकिस्तानच्या ताब्यात ६०० हिंदी युद्धकैदी आहेत.

---


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. १-३८३३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



चवदार पिठासाठी

पिठाच्या चक्क्या
• बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
• मजबूत बांधणी
• अद्यावत् यंत्र योजना
• साईज १४", १६", १८"




उत्पादक –
भिडे अँन्ड सन्स प्रा. लि. सांगली
महाराष्ट्र राज्य.

## आत्मघात करणाऱ्यांच्या संख्येत झालेली वाढ

१९६९ साली हिंदमध्ये ४३,६३३ व्यक्तींनी आत्मघात करून घेऊन इहलोकीची जीवनयात्रा संपविली. १९६८ सालातील आकड्यांशी तुलना करता आत्मघात करणारांची संख्या ७·२ टक्क्यांनी वाढलेली आढळून येते. लोकसंख्येच्या वाढीच्या गतीपेक्षा आत्मघातांची गती चौपट दिसून येते. आत्मघात करून घेण्याची कारणे अनेक प्रकारची असतात. हिंदी समाजात सासू-सुनेचे न पटल्याची अनेक उदाहरणे आजही पाहावयास सापडतात. ह्या कारणामुळे आत्मघात करणारांची संख्या ३,२५९ इतकी भरली. सास्वासुनांच्या भांडणाचा परिणाम आत्मघातापर्यंत पोचण्याच्या प्रकारात १५ टक्के वाढ झालेली दिसून येते. सर्वात अधिक आत्मघात रोगग्रस्तांनी केल्याचे आढळून आले आहे. त्याशिवाय प्रेमाला प्रतिसाद न मिळाल्यामुळे, दारिद्र्यामुळे, परीक्षेत नापास झाल्यामुळे, मालमत्तेवरून झालेल्या भांडणामुळे, अनेकांनी आत्महत्त्या केल्याचे दिसते. पतिपत्नीच्या भांडणाचा परिणामही आत्महत्त्येत झालेला दिसतो. सर्वात अधिक आत्मघात विष घेणे अगर जलाशयात उडी देणे ह्या प्रकारांनी केलेले दिसतात. मुंबईत सासुसूनेच्या भांडणामुळे एकच आत्मघाताचा प्रकार घडला. कलकत्त्यात असे दोन प्रकार घडले. दर लाख लोकांमागे आत्महत्त्या करणारांचे महाराष्ट्रातील प्रमाण इतर राज्यांच्या मानाने अधिक आहे. तथापि सर्वात अधिक आत्मघाताचे प्रकार उत्तर प्रदेशात घडले. तेथील आत्मघाताची संख्या ५,६९९ आहे. त्या खालोखाल प. बंगालमध्ये ५,६१३, मद्रासमध्ये ४,९६७ आणि महाराष्ट्रात ४,३३४ आत्मघाताचे प्रकार घडले. रोगाला कंटाळून आत्महत्त्या केलेल्यांची संख्या सर्वात अधिक म्हणजे ६,१६९ इतकी आहे. बहुतेक रोग्यांच्या व्यथा असाध्य होत्या.

---

## रशियाकडून कापसाची आयात

रशियाकडून कापसाची आयात करणे कितपत शक्य आहे ते अजमावण्यासाठी एक हिंदी प्रतिनिधीमंडळ लवकरच मॉस्कोला जाणार आहे. सध्याच्या अंदाजाप्रमाणे भारताला रशियाकडून १ लाख गासड्या कापूस मिळण्याची शक्यता दिसत आहे. अमेरिकेच्या सरकारने पी. एल. ४८० कायद्याप्रमाणे भारताला द्यावयाचा कापूस देण्याचे स्थगित केले असल्यामुळे हिंद सरकार इतर देशाकडून कापूस मिळविण्याच्या खटपटीत आहे. ह्यावर्षी देशातील कापसाचे उत्पादन ५९ ते ६० लाख गासड्या होईल असा अंदाज आहे. गेल्या वर्षाच्या मानाने कापसाच्या उत्पादनात सुधारणा झाल्याचे दिसते.

---

## कलवार येथे स्कूटरचा कारखाना

राजस्थान स्टेट इंडस्ट्रिअल अँड मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनला स्कूटरच्या उत्पादनासाठी लेटर्स ऑफ इंटेंट देण्यात आली आहेत. ह्या कारखान्याला १·८९ क. भांडवली खर्च येईल आणि त्यात दरसाल २४,००० स्कूटर तयार होतील.

## भाक्रा धरणावरील विजेच्या उत्पादनात कपात

उन्हाळ्यात भाक्रा धरणातील पाण्याचा साठा कमी होतो आणि त्यामुळे धरणातील पाण्याच्या साह्याने निर्माण करण्यात येणाऱ्या विजेत कपात करावी लागते. ही कपात एकदम करण्यात आल्यास विजेवर असणाऱ्या उद्योगधंद्यांना एकदम धक्का बसतो. म्हणून धरणातील पाणी काटकसरीने वापरण्यास आताच प्रारंभ करण्यात आला आहे. विजेची निर्मिती ५०० मेगॅवॅटच्या ऐवजी ४३० मेगॅवॅटच करण्यात येणार आहे. विजेच्या निर्मितीमधील ही कपात तावडतोब अमलात येणार असून त्यामुळे पंजाब, हरयाणा आणि राजस्थान ह्या राज्यांना होणाऱ्या विजेच्या पुरवठ्यातही कपात होणार आहे. पंजाब राज्य भाक्रा धरणावरील विजेवरच मुख्यतः अवलंबून असते. वीजनिर्मितीत कपात झाल्यामुळे होणारे वाईट परिणाम टाळण्यासाठी नानगल येथील खताच्या कारखान्याला करण्यात येणारा पुरवठा १२४ मेगॅवॅटऐवजी ९८ मेगॅवॅटच करण्यात येणार आहे. अर्थातच खताची निर्मिती काहीशी कमी होईल.

## आता अमेरिकेकडून मदत मिळणार नाही

वॉशिंग्टनमधील निरीक्षकांनी केलेल्या अंदाजाप्रमाणे भारताला आता अमेरिकेकडून मदत मिळण्याची शक्यता जवळ जवळ नाहीच. भारतानेही ह्या वस्तुस्थितीची दखल घेऊन आपल्या पायावर उभे राहण्याचे ठरविले आहे. तथापि भारताला मदतीची जरूर आहे अशीच अमेरिकेला ती देण्याचीही आहे. प्रे. निक्सन ह्यांचे परराष्ट्रीय नीतीचे सल्लागार डॉ. किसिंजर ह्यांनी भारताची सर्व मदत तोडण्याचा सल्ला दिला. त्यावर मदत संघटनेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने अमेरिकेतील वनस्पती तेलाच्या घसरत्या किमतीकडे बोट दाखविले. किमती अधिक घसरू नयेत म्हणून तेलाची भारताला निर्यात करणे आवश्यक असल्याचे त्याने सांगितले. भारतात हरित क्रांतीमुळे गहू विपुल पिकला आहे. भारताने गहू घेण्याचे नाकारले आहे. बुडलेली गिऱ्हाइकी अंशतः मिळविण्यासाठी तेल देण्याची तयारी अमेरिकेने दाखविली होती. परंतु भारताने काहीच उत्तर दिले नाही.

## लंडनमधील पोलिस हिंदी शिकतात

लंडनमधील न्यूहॅम भागातील पोलिसांनी हिंदी भाषा शिकण्यास प्रारंभ केला आहे. ह्या भागात स्थायिक झालेल्या हिंदी लोकांची संख्या बरीच आहे. त्यांच्याशी चांगले संबंध ठेवण्यासाठी पोलिसांना हिंदी भाषेचा उपयोग होणार आहे. न्यूहॅम भागाची लोकसंख्या २ लाख, ६० हजार असून त्यात निदान २५ हजार तरी हिंदी आहेत. अलीकडेच हिंदी भाषेचा सहा महिन्यांचा अभ्यासक्रम ९ पोलिस अधिकाऱ्यांनी पुरा केला आहे. त्यांना कामापुरते हिंदी बोलता येऊ लागले आहे. हिंदी लोकांशी त्यांच्याच भाषेत बोलण्याचे प्रसंग वारंवार येत असल्यामुळे त्यांचे हिंदीही सुधारू लागले आहे. अर्थातच गैरसमज होण्याचे प्रकार कमी झाले आहेत आणि परस्परांचे संबंध अधिक सुकर होत आहेत.

## कंपन्याकडे ठेवी ठेवणाऱ्यांना मार्गदर्शन

लहान प्रमाणावर भांडवल गुंतवून निश्चित उत्पन्न मिळविण्याचे प्रयत्न करणारा वर्ग समाजात असतो. ह्या वर्गाला बँकांकडे ठेवी ठेवल्यास मिळणारे उत्पन्न कमी वाटते व म्हणून खाजगी मालकीच्या कंपन्याकडे ठेवी ठेवून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्यास तो उद्युक्त होतो. मुंबई येथे फोरम ऑफ फ्री एंटरप्राइज ह्या संघटनेतर्फे छोटी गुंतवणूक करणारांना मार्गदर्शन करण्यासाठी एक सभा भरविण्यात आली होती. सभेला बरीच गर्दी झाली होती. सभेत ह्या विषयासंबंधी आस्था असणारे सॉलिसिटर श्री. एस्. आर. वकील ह्यांनी कायद्याच्या दृष्टिकोनातून मार्गदर्शन केले. श्री. वकील ह्यांचे म्हणणे असे की, बिगर-बँकिंग कंपन्यांतून ठेवी ठेवणारांच्या संभाव्य नुकसानीस प्रत्येकजणच कमी-अधिक प्रमाणात हातभार लावीत असतो. लोकांकडून पैसे घेऊन अल्पावधीत जास्तीत जास्त नफा कमावू पाहाणारा धंदेवाला, भांडवलाच्या सुरक्षिततेऐवजी मिळणाऱ्या व्याजाच्या दराकडे अधिक लक्ष देणारे लोक आणि घाम गाळून मिळविलेला पैसा शंकास्पद कंपन्यात गुंतविण्याचा सल्ला देणारे सल्लागार हे सर्वच ह्या परिस्थितीला जबाबदार आहेत. श्री. वकील ह्यांनी गुजरातमधील एका कंपनीचे उदाहरण दिले. ह्या कंपनीने ठेवींच्या रूपाने लोकांकडून जवळ जवळ ५० लाख रुपये जमविले. कंपनीचे वसूल भांडवल अवघे ५ लाख रुपये होते. इतकेही करून कंपनीने प्रत्यक्ष उत्पादनला प्रारंभ केलाच नाही. ह्या उदाहरणावरून कोणत्याही स्वरूपात भांडवल गुंतविताना सावधगिरी बाळगणे कसे आवश्यक आहे ते स्पष्ट होते. तथापि, ह्यासंबंधी अगदी काटेकोर असे नियम घालून देणे अशक्य असते. काही मार्गदर्शनवर सूचना मात्र करता येण्यासारख्या आहेत.

### कर्ज आणि ठेव ह्यातील फरक

पहिली सूचना अशी की, कोणीही १२ टक्क्यांपेक्षा अधिक दराने व्याज देण्याचे आमिष दाखविणाऱ्या कंपनीत पैसे गुंतवू नयेत. सध्या देशात व्याजाच्या दराची जी परिस्थिती आहे तीत १२ टक्क्यांपेक्षा अधिक व्याज देणे कोणत्याही सुस्थित कंपनीला परवडणार नाही. ज्या कंपन्या अगर दलाल काळ्या पैशाच्या साह्याने व्यवहार करतात त्यांनाच त्यापेक्षा अधिक व्याज देणे शक्य होते. पैसे गुंतविताना पब्लिक लिमिटेड कंपन्यांना प्राधान्य देण्यात यावे. त्यानंतर प्रायव्हेट लिमिटेड कंपन्या, भागीदारीच्या फर्म्स, अविभक्त हिंदू कुटुंब व खाजगी व्यक्ती ह्यांचे अनुक्रम लागतात. एखादी कंपनी अगर व्यक्ती पैसे गुंतविणाराच्या खास माहितीतील असेल तर गोष्ट वेगळी. एरव्ही भांडवल अगर ठेवी देताना सार्वजनिक भांडवलाच्या मर्यादित जबाबदारीच्या कंपन्यांना अग्रहक्क देणे उत्तम. अलीकडे रिझर्व्ह बँकेने तारणाशिवाय कर्जे स्वीकारण्याविषयी जे पत्रक काढले आहे ते सदोष आहे. अशी कर्जे स्वीकारण्यावर बंधने घालण्यात आली असली तरी त्यांनी भांडवल गुंतविणाराचे संरक्षण होण्यासारखे नाही. ह्या बंधनांना दाद न देता काही विशिष्ट प्रकारच्या कंपन्या ठेवी घेऊ शकतात; उदाहरणार्थ बांधकाम कंपन्या. दुसरे असे की जी बंधने घालण्यात आली आहेत ती शिफारसवजा आहेत, बंधनकारक नाहीत. म्हणून पैसे गुंतविणाऱ्यांनी दलालाकडून कंपनीविषयी व तिच्या नफा-तोटा पत्रकाविषयी तपशीलवार माहिती घेऊनच पैसे गुंतविण्याचा निर्णय घ्यावा. अलीकडे काही कंपन्या ठेवीऐवजी कर्जरोख्यावर पैसे घेतात. ह्या बाबतीत एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे; कर्जरोख्यावर दिलेले कर्ज वसूल करण्यास कर्जाच्या तारखेपासून तीन वर्षांची मुदत असते. ठेवीचे पैसे वसूल करण्यास मात्र ठेवीची मुदत संपल्यापासून अगर मागणी केल्यापासून तीन वर्षांची मुदत असते. ठेव ही बिनशर्त व तारण विरहित कर्ज असते, हेही लक्षात ठेवले पाहिजे.

---

## आर्थिक नियोजनाला संरक्षणविषयक दृष्टी हवी

आर्थिक नियोजनाचे धोरण, विकास एकसारखा चालू राहावा ह्या हेतूने स्वीकारण्यात येते. देशावर परचक्र येण्याची भीती नसेल तर नियोजन अधिक प्रभावीपणे करता येईल हे उघडच आहे. पण, भारतीय स्वातंत्र्याची गेली २४–२५ वर्षे भारताला आक्रमणाच्या छायेतच काढावी लागली. तेव्हा आर्थिक नियोजन करताना संरक्षणविषयक दृष्टिकोणाला प्राधान्य देणे उशिरा का होईना पण अनिवार्यच म्हटले पाहिजे. ह्या बाबतीत एक उदाहरण देण्यासारखे आहे. भारत सरकारच्या खनिज तेल खात्याने पंजाबच्या अगर राजस्थानच्या वायव्य सरहद्दीवर एक मोठा तेलशुद्धीचा कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागात काढण्याचे ठरविले होते. हा निर्णय इतर दृष्टीने योग्य मानला तरी संरक्षणाच्या दृष्टीने चुकीचा होता हे पाकिस्तानशी नुकत्याच झालेल्या युद्धात दिसून आले. आता हा निर्णय रद्द करण्यात आला आहे. संकल्पित कारखान्याला अशुद्ध तेलाचा पुरवठा करण्यासाठी ओखा ह्या सौराष्ट्रातील बंदरापासून नळ टाकण्यात येणार होते. नुकत्याच झालेल्या युद्धात पाकिस्तानी विमानांनी ओखा बंदरावर अनेक वेळा बाँबहल्ला केले. ह्यावरून अशुद्ध तेल पुरवठ्याची ही योजना किती धोक्याची होती हे स्पष्ट होते. खनिज तेलाचे उत्पादन अगर वाहतूक अधिक संरक्षित असावयास पाहिजे. गुजरात राज्यात कोयाली येथे रशिआच्या मदतीने तेलशुद्धीचा कारखाना काढण्यात आला आहे. तसे म्हटले तर हा कारखानाही पाकिस्तानच्या विमानांच्या कक्षेतच येतो. गेल्या युद्धात पाकिस्तानच्या विमानांनी तिकडे नजर दिली नाही, ही काहीशी नवलाचीच गोष्ट म्हटली पाहिजे. तात्पर्य, विकासकार्यात भांडवल गुंतवताना शत्रूच्या संभाव्य हल्ल्यांचाही विचार आता झाला पाहिजे.

# हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रीज ॲण्ड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड, नागपूर

## मध्यमवर्गीयांसाठी मध्यमवर्गीयांची आदर्श कंपनी

देशात अनेक बँका असताना आणखी एका बँकेसारख्या संस्थेची आवश्यकता काय? मध्यम वर्गीयांस किंवा अन्य ठराविक चाकोरीबाहेरील लोकांस घर बांधण्याच्या वेळी अथवा खरेदीच्या वेळी अथवा व्यापाराशिवाय इतर कौटुंबिक किंवा अन्य अडचणीचे वेळी कर्जरूपाने मदत मिळण्याचे साधन नाही, व ही सामाजिक गरज भागविण्यासाठी एका आर्थिक कारभार करणाऱ्या संस्थेची नितांत आवश्यकता आहे, ह्या दृष्टिकोनातून वरील कंपनीची ५ एप्रिल, १९५१ रोजी इंडियन कंपनीज ॲक्ट खाली स्थापना करण्यात आली. मध्यमवर्गीयांच्या अडचणी भागविण्यासाठी मध्यमवर्गीयांनी स्थापन केलेली संस्था, असे ह्या कंपनीचे स्वरूप आहे. ठेवी स्वीकारून त्या ठेवींचा बँकिंगच्या तत्त्वानुसार मध्यमवर्गीयांच्या आर्थिक अडचणी निवारण्यासाठी कर्जरूपाने उपयोग केला जातो. मुदती ठेवी, मासिक हप्तेवारीच्या बचत योजना, भविष्य सहाय्यक निधी, योगक्षेम निधी, दशवार्षिक बचत ठेव योजना, अशा आकर्षक योजना कंपनीने ठेवीदारांसाठी आखलेल्या आहेत.

कंपनीचा ठेवीदार भागधारक (शेअरहोल्डर) असावा लागतो. ठेव ठेवते वेळी रु. ५० दराचा किमान शेअर खरीदणे आवश्यक आहे. शेअरवर मागील कित्येक वर्षे कंपनी ८ टक्के दराने नफावाटणी (डिव्हिडंड) करीत आहे. भागधारक होण्याने कंपनीचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-नुकसान-पत्रक मिळून आपले हितसंबंध असलेल्या कंपनीच्या कारभाराची खडानूखडा माहिती मिळते व आपल्या भागधारकांच्या दृष्टीने ही आवश्यक बाब आहे. ठेवी आपल्या स्वतःच्या नावाने, एकापेक्षा जास्त अशा संयुक्त नावाने, किंवा अज्ञान मुलामुलींच्या नावानेही ठेवता येतात.

ठेवीदारांच्या ठेवी वेळेवर परत करता याव्यात म्हणून कंपनी फार मोठ्या प्रमाणात प्रवाही निधी बाळगते. सरकारी रोखे, प्रतिष्ठित कंपन्यांचे शेअर्स, युनिट ट्रस्ट, मोठ्या बँकांमध्ये अल्प मुदतीच्या ठेवी व बँकांमध्ये चालू खात्यावर रकमा व रोख शिलका ह्याप्रकारे प्रवाही निधी बाळगते.

कंपनी मध्यमवर्गीयास सरकारमान्य दराने कर्जाऊ रकमा देते. कर्जाचे तारण, परतफेडीची पात्रता व कर्जदाराचे चारित्र्य ह्या बाबी लक्षात घेऊन संचालक मंडळ कर्ज मंजूर करते. घर बांधणे, घर विकत घेणे अथवा असलेल्या घरात फेरबदल करणे, वाढ करणे, रिपेअरी करणे अथवा घर विकत घेण्यासाठी झालेल्या कर्जाचे निवारण करणे, ह्यासाठी मध्यम मुदतीचे घराच्या तारणावर कर्ज दिले जाते. घराच्या किंमतीच्या (सध्या असलेल्या किंवा कर्जाऊ रकम घेऊन बांधल्या जाणाऱ्या) ५० टक्यांपर्यंत कर्जाऊ रकम दिली जाते. घरबांधणीसाठी दिले जाणारे कर्ज हप्तेवारीने म्हणजे पहिला हप्ता पाया भरून जोता तयार झाल्यावर, दुसरा हप्ता घराची स्लॅब करावयाचे वेळी, तिसरा हप्ता घराची इतर पूर्ती करावयाचे वेळी, दिले जाते. कर्जाच्या परतफेडीचा हप्ता साधारणपणे १·५० रु. शेकडा दरमहा ह्या दराने व्याज व मुद्दल मिळवून द्यावयाचा असतो. व्याजाची आकारणी करमिती पद्धतीने कंपनीच्या निर्धारित व्याजाच्या दराने केली जाते. परतफेडीचा मासिक हप्ता दरमहा १० तारखेच्या आत पटविल्यास व्याजाच्या दरात नियमानुसार सूट मिळते.

ह्याशिवाय सोन्याचे दागिने, चांदीच्या वस्तू, आयुर्विमा पॉलिसी, हातमागाच्या साड्या, प्रतिष्ठित कंपन्यांचे शेअर्स, डिबेंचर्स व इतर रोखे, यंत्रे व इतर सहज विकता येण्याजोगा कंपनीच्या गोदामात ठेवलेला व्यापाऱ्यांचा माल, ह्या तारणावरही कंपनी कर्जाऊ रकम देते.

"कर्जरूपाने मदत मिळण्याचा अत्यंत सोपा मार्ग म्हणजे प्रथम आपले संबंध प्रस्थापित होऊन आपल्या स्वतःविषयी शक्य तितकी अधिक माहिती आम्हांस होणे आवश्यक आहे. त्यासाठी भागधारक होऊन बचतीचे कोणते ना कोणते खाते उघडून आमच्या 'हिंदफिन' कुटुंबाचे एक घटक बना. आपल्या-जवळील पुंजी आज कंपनीत गुंतविल्याने आपल्यासारख्याच एखाद्या गरजू बांधवाची निकड भागविण्यास मदत होईल व आपल्या गरजेच्या वेळी कंपनीचा मदतीचा हात आपोआप पुढे येईल." असे संचालकांचे म्हणणे आहे.

३०-६-१९७१ अखेरच्या ताळेबंदाप्रमाणे कंपनीचे वसूल भांडवल ६,५४,५०० रु. असून तिच्या गंगाजळीत ३९,१२४ रु. आहेत. ठेवींच्या रूपाने तिच्याकडे ५४,१७,५२७ रु. आहेत. कंपनीने ५,९०,९०६ रु. कर्जरोख्यांत गुंतवून ७,९३,४४९ रु. रोख व बँकांत ठेवले आहेत. त्यावरून कंपनीच्या तरतेपणाची कल्पना येईल. तारणावरील कर्जे ४६,८१,८६४ रु. ची आहेत; तारणाविरहित पण शहाजोग फक्त २,०४,४५७ रु. ची कर्जे आहेत. कंपनीला १,१४,४८१ रु. निव्वळ नफा होऊन कंपनीने ८% करपात्र डिव्हिडंड जाहीर केले.

रिझर्व्ह बँकेने हिंदफिन कंपनीची हाउसिंग फिनॅन्स कंपनी म्हणून गणना केलेली आहे, कारण कंपनीचा मुख्य धंदा घरांसाठी कर्ज देणे हाच आहे. ही कर्जे मुख्यतः मध्यमवर्गीयांना घरांच्या साध्या तारणावर दिली जातात; ८ ते १० वर्षांत दरमहाच्या हप्त्यांच्या द्वारा ती त्यांनी फेडावयाची असतात. अशा छोट्या आकाराच्या कंपनीला ठेवींच्या बाबतीत बँका, पोस्टल सेव्हिंग्ज बँका, युनिट ट्रस्ट, आणि नव्यानेच अवतार घेतलेल्या चिटफंडांची तीव्र स्पर्धा सहन करावी लागते. कराचा बोजाही असह्य असतो.

(३० जून १९७१ च्या ताळेबंदात वरील प्राप्तिकरासाठी ६०,००० रु. ची तरतूद करावी लागली आहे.) त्यापैकी डिव्हिडंडही द्यावे लागते. वास्तविक ध्येयवादाने आणि सचोटीने चालविण्यात येणाऱ्या लहान कंपन्यांकडे सरकारने आणि रिझर्व्ह बँकेने अधिक सहानुभूतीने पाहून त्यांना उत्तेजन दिले पाहिजे. सव्वा घोडे बारा टक्के अशा पद्धतीने त्यांनी चालून उपयोगी नाही. ठेवीवर लादलेली रिझर्व्ह बँकेची नवी बंधने कंपनीच्या सेवांवर प्रतिकूल परिणाम करणारी आहेत. ह्या बाबतीत कंपनीने कितीही अर्ज-विनवण्या करून उपयोग होत नाही; चेंबर्स ऑफ कॉमर्ससारख्या वजनदार प्रातिनिधिक संस्थांनी रास्त गाऱ्हाणी सरकार व रिझर्व्ह बँक दरबारी मांडली पाहिजेत. हिंदफिनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. जी. आर. श्रोती ह्यांनी कंपनीचा कारभार आदर्श पद्धतीने चालविला असून मध्यमवर्गीयांची बहुमोल सेवा चालविली आहे; तिला पाठिंबा मिळत राहिला पाहिजे.

---

### क्रिकेटरचा मॅनेजिंग डायरेक्टर झाला

श्री. टी. व्ही. पार्थसारथी, ह्यांची हेवी इलेक्ट्रिकल्स (इंडिया) लि. भोपाळ, च्या मॅनेजिंग डायरेक्टरपदी नियुक्ती झाली आहे. श्री. पार्थसारथी ह्यांनी बंगलोर येथील इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्समध्ये आपले इलेक्ट्रिकल टेक्नॉलॉजीचे शिक्षण पुरे केले आणि नंतर काही काळ हिंदुस्थान एअर क्राफ्टमध्ये त्यांनी काम केले. पुढे असोसिएटेड इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीजमध्ये आणि नंतर हेवी इलेक्ट्रिकल्समध्ये त्यांनी कमार्शिअल मॅनेजर, जनरल मॅनेजर आणि ॲक्टिंग मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम केले. त्यांचे वय ५५ वर्षांचे आहे.

यष्टिरक्षक आणि फलंदाज म्हणून युद्धोत्तर त्यांनी उत्तम कामगिरी केली होती; त्या गुणांवर त्यांची भारतीय संघात सहज निवड होई. त्यांच्या नोकरीचा व्याप वाढत गेला, तसे त्यांनी क्रिकेट सोडून दिले.

### कलकत्ता येथील चित्रपटांना बांगला देशाची बाजारपेठ

कलकत्ता येथे बांगला देशमध्ये तयार झालेले चित्रपट नाताळचे वेळी दाखविण्यास प्रारंभ झाला. बंगाली भाषेची चळवळ ही त्या चित्रपटाची पार्श्वभूमी आहे. तो चित्रपट दाखविण्यास पाकिस्तानी राज्यकर्त्यांनी बंदी घातली होती. बांगला देशचे लोक प. बंगालमध्ये तयार झालेले चित्रपट बघण्यास आतुर झाले आहेत. कलकत्ता येथील चित्रपटांना आता नवी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

### बँक बोर्डाची नेमणूक लवकरच होणार

राष्ट्रीयीकृत १४ बँकांच्या व्यवस्थापक मंडळाच्या सदस्यांची नावे ह्या महिनाअखेर जाहीर होतील. ह्या मंडळात उद्योगपती, बँकिंग तज्ज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, त्याप्रमाणे बँकेच्या खातेदारांचा प्रतिनिधी, ह्यांचा समावेश असेल. प्रत्येकाच्या आर्थिक व्यवहाराची कसून गुप्त तपासणी केल्यावरच सदस्यांची नेमणूक केली जाणार असल्यामुळे एवढा विलंब लागला. बँक कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी कसा निवडायचा, हेही ठरविणे अवघड होते.


# ओगले
## प्रभाकर कंदील

- अंधाऱ्या रात्री,
- वादळी वाऱ्यात,
- ओबड-धोबड रस्त्यावर,
- खवळलेल्या दर्यावर


मार्गदर्शक व विश्वसनीय.

तयार करणार

ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड

ओगलेवाडी (जि. सातारा)

(मासळा सातारा)




## नाण्याला तीन बाजू असतात...

दोन नेहमीच्याच आणि तिसरी बाजू परीघ (जाडी)

युनायटेड वेस्टर्न बँकेत रक्कम गुंतविल्याने नाण्याचा परीघ वाढतो म्हणजेच रकमेत वाढ होते. आकर्षक व्याज दराच्या, गरजेनरूप विविध ठेव योजना.

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कचेरी: चिरमुले निकेतन, राजपथ, सातारा.

स्थापना: १९३६ महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा शेड्युल्ड बँक

वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अँड एक्झीक्युटर कंपनी लि.

बँकेच्या या संलग्न संस्थेमार्फत विश्वस्त निधी व व्यवस्थापनाची कामे केली जातात

# नहीं—
# यह कोई साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सेनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और कार्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोड़े ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैः १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है. २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**




## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

बर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन : कार्यालय : २५११७१ कारखाना : ३५१०१





हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)